# मोटार वाहन विभागाचे कार्य-परिचय

मोटार वाहन कायदा १९३९ तसेच विविध कर विषयक कायदे यांतील तरतुदींची अंमल बजावणी महाराष्ट्र राज्यात करण्याकरीता मोटार वाहन कायदा, कलम १३३(अ)(१) अन्वये राज्यातील मोटार वाहन विभागाची स्थापना १ एप्रिल १९४० साली करण्यात आली.

मोटार वाहन विभागाची प्रामुख्याने महत्वाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

(अ) मोटार वाहन कायदा, १९८८ व त्या खालील केंद्राने व महाराष्ट्र राज्याने तयार केलेल्या विविध नियमांच्या तरतुदींची अंमल बजावणी करणे.

(ब) मोटार वाहन कर कायदा, १९५८ व मुंबई मोटार वाहन (प्रवासी कर) कायदा, १९५८ नुसार अंमल बजावणीकरुन राज्याला महसूल प्राप्त करुन देणे.

**मोटार वाहन विभागातील कार्यालयात खालीलप्रमाणे काम केले जाते :—**

(१) मोटार वाहन कायदा १९८८ व त्या खालील केंद्राने व महाराष्ट्र राज्याने तयार केलेल्या त्यांच्या विविध तरतुदींची अंमल बजावणी करणे.

(२) रस्ता वाहतुकीच्या लोकांच्या गरजा व हित लक्षांत घेऊन वाहनांना परवाना देणे. त्याद्वारे माल व प्रवासी वाहतुकीस गती व संरक्षण देणे. रस्त्यावरील वाहतूक धंद्याच्या सर्वांगीण वाढीच्या दृष्टीने समन्वय साधून त्या व्यवसायाच्या प्रगतीस वाव देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे.

(३) मोटार वाहन कर कायदा १९५८ व मुंबई मोटार वाहन (प्रवासी कर) कायदा, १९५८ नुसार कर आकारणी व कर वसूलीद्वारे राज्य शासनाला महसूल प्राप्त करुन देणे.

(४) मोटार वाहन चालविण्यासाठी अनुज्ञप्ती देणे व त्याचे नुतनीकरण करणे.

(५) चालकांना प्रवासी वाहनांची लायसेन्स देणे व त्याचे नुतनीकरण करणे.

(६) मोटार वाहन चालविण्याचे शिक्षण देणाऱ्या संस्थांना प्राधिकृत करणे.

(७) टप्पा बस गाडयांच्या वाहकांना लायसेन्स देणे व त्यावर प्रतिस्वाक्षरी करणे.

(८) आंतरराष्ट्रीय वाहन चालकांचा परवाना देणे.

(९) मोटार वाहनांची नोंदणी करणे.

(१०) परिवहन संवर्गातील वाहनांना योग्यता प्रमाणपत्र देणे.

(११) आंतरराज्य वाहतुक करण्यासाठी वाहनांना परवाने देणे/प्रतिस्वाक्षरी करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे.

(१२) अखिल भारतीय पर्यटक बस व टॅक्सीसाठी परवाने देणे.

(१३) मोटार वाहन कायदा, १९८८ मधील प्रकरण अकराच्या अंमल बजावणीसाठी मोटार वाहनांच्या विमा विषयक नोंदी ठेवणे.

(१४) मोटार वाहन कायदा व कर विषयक कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करण्याविरुध्द खातेनिहाय कारवाई करणे अगर न्यायालयीन कारवाई करणे.

(१५) वाहनापासून होणाऱ्या प्रदुषणावर नियंत्रण ठेवणे, प्रदुषणकारी वाहनांवर कारवाई करणे.